दैनिक अन्यायाचा प्रतिकार महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १६ वे ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.१ एप्रिल २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# गुढीपाडव्यापासून महाराष्ट्र निर्बंधमुक्त

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**गेल्या २ वर्षापासून जगभरात कोरोना महामारीची दहशत कायम होती. मात्र आता हळूहळू महामारी नियंत्रणात येत असल्याने कोरोनामुळे घातलेले निर्बंध हटवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्रातही गुढीपाडव्याच्या मुहुर्तावर कोरोनाचे निर्बंध हटवण्यात आले आहेत. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय एकमताने घेण्यात आल्याची माहिती आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी दिली. या निर्णयामुळे राज्यात गुढीपाडवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीला होणाऱ्या मिरवणुका मोठ्या जल्लोषात काढण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**



याबाबत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले की, गुढीपाडवा म्हणजे नववर्षाची सुरुवात. जुनं ते मागे सारुन नवीन कार्याचा प्रारंभ करणारा हा दिवस. गेल्या दोन वर्षापासून आपण कोरोनाच्या भयंकर विषाणूचा यशस्वीरित्या मुकाबला केला आणि आज हे सावट दूर होताना दिसते.

एक नवीन सुरुवात करण्यासाठी म्हणून आ-पत्ती व्यवस्थापन कायदा तसेच साथरोग प्रतिबंधक कायद्यान्वये कोरोना काळात लावण्यात आलेले निर्बंध गुढीपाडव्यापासून (२ एप्रिल) पूर्णपणे उठवण्यात येत आहेत असं मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घोषित केले. यावेळी त्यांनी मंत्रिमंडळाच्या वतीने राज्यातील जनतेला गुढीपाडव्याच्या शुभेच्छा दिल्या.

तसेच कोरोनाचा भविष्यात धोका उद्भवू नये यासाठी नागरिकांनी मास्क घालणे, सुरक्षित अंतर ठेवणे कोरोना प्रतिबंधक लस घेणे आवश्यक आहे. आरोग्याचे नियम पाळून आपली तसेच इतरांची देखील काळजी घ्यावी, असं आवाहन देखील मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी केले आहे. याबाबतीतले सविस्तर आदेश तातडीने देण्याचे निर्देश देखील त्यांनी प्रशासनाला दिले. त्याचसोबत मास्क घालणं ऐच्छिक असेल. त्यावर कुठलीही सक्ती केली जाणार नाही असं राजेश टोपेंनी स्पष्ट केले.

दरम्यान, गेल्या दोन वर्षापासून राज्यातील डॉक्टर्ससह सर्व फ्रंटलाईन कर्मचारी, एवढेच नव्हे तर सर्व नागरिकांनी कोरोनाशी लढतांना एकमुखाने आणि एकदिलाने राज्य शासनाच्या प्रयत्नांना बळ दिले, असे सांगून मुख्यमंत्र्यांनी या सर्वांना देखील मन:पूर्वक धन्यवाद दिले. या संपूर्ण काळात राज्यातील विविध जाती-धर्म आणि पंथाच्या नागरिकांनी त्यांच्या सण, उत्सव तसेच समारंभांना देखील मर्यादित ठेवले व संयम पाळला. पोलीस यंत्रणा, पालिका-नगरपालिका, महसूल व ग्रामविकास यंत्रणा आणि एकूणच प्रशासनाने कोरोनाचा दिवस रात्र मुकाबला केला, याविषयी मुख्यमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले तसेच सर्वांचे मनापासून आभार देखील मानले.

# उरणमधील ओएनजीसी प्रकल्पात आगीच्या ज्वाला

## आगीत एक कर्मचारी जखमी ; मात्र सुदैवाने जिवीत नाही

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील ओएनजीसी प्रकल्पाला काल गुरुवार दि.३१ मार्च ०२२ रोजी सायंकाळच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली आहे.

उरण येथील पिरवाडी समुद्र किनार्याला व शहराजवळ असलेल्या नैसर्गिक तेल आणि वायू प्रकल्पाला ही आग लागली आहे. घटनास्थळी अग्निशमन दल दाखल झाले असून आग्निशमन दलाच्या जवानांना आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले आहे.

या आगीत एक कर्मचारी जखमी झाल्याची खबर मिळाली असून सुदैवाने कोणत्याही प्रकारची जीवित हानी झाली नाही. तर सदर आग ही नविन प्रकल्पाचे काम सुरू असताना वेल्डिंगची ठिणगी पडून लागली असल्याची माहिती मिळाली आहे.उरणमधील नैसर्गिक तेल आणि वायू प्रकल्पामध्ये या आगोदर तीन वर्षांपूर्वी पावसाळ्यात गणेशोत्सवात भिषण आग लागण्याची दुर्घटना झाली होती .

त्यावेळी अग्निशमन दलाचे एका अधिकाऱ्यांसह ४ जवानांना आपला जीव गमवावा लागला होता.सदर आग ही ड्रेनेज मधील तेल ज्या पाण्याच्या साठवण तलावामध्ये साठविण्यात येत असलेल्या तलावाला आग लागली आहे. सदर आगीवर आग्निशमन दलाला नियंत्रण मिळवण्यात यश आले आसले तरी परिसरामध्ये भितीचे वातावरण पसरले आहे.



# राज्यात 'रेडी रेकनर'च्या दरात सरासरी ८.८० टक्के वाढ

**दै.रायगड नगरी । मुंबई**

नवं घर घेण्याचं स्वप्न तुम्ही पाहात असाल तर एक धक्का देणारी बातमी समोर आली आहे. राज्य सरकारकडून रेडी रेकनरचे नवे दर जारी केले असून यावेळी राज्यात सरासरी ८.८० टक्के दरवाढ झाली आहे. त्यामुळे घर घेणं आता आणखी महाग होणार आहे. कोरोना काळामुळे गेल्या दोन वर्षांपासून रेडी रेकनरच्या दरात वाढ करण्यात आली नव्हती. पण आता ठाकरे सरकारनं नवे दर जारी करुन धक्का दिला आहे. पण मुंबई वगळता रेडी रेकनरचे दर १ एप्रिलपासून लागू होणार आहेत. वर्ष २०२२-२३ वर्षासाठी हे नवे दर लागू असतील. राज्यात सरासरी ८.८० टक्के इतकी वाढ रेडीरेकरनच्या दरात जाहीर करण्यात आली आहे.

राज्याच्या ग्रामीण भागात सरासरी ६.९६ टक्के वाढ लागू होणार आहे. नगरपालिका तसेच नगरपंचायती क्षेत्रात ३.६२ टक्के वाढ आणि महापालिका क्षेत्रात ८.८० टक्के वाढ (मुंबई वगळता) लागू करण्यात आली आहे. राज्यात रेडी रेकनरच्या दरात मुंबई वगळता एकूण ५ टक्के सरासरी दरवाढ झाली आहे.

.../२

# मरीन ड्राइव्हसमोर भव्य ७ मजली 'मराठी भाषा भवन'

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गुढीपाडव्याला भूमिपूजन

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते मराठी भाषा भवन, मुख्य केंद्र या इमारतीचे भूमिपूजन मराठी नववर्ष दिनी गुढीपाडव्याला (दि. २ एप्रिल २०२२) सकाळी अकरा वाजता होणार आहे. जवाहर बालभवन चर्नी रोड येथे होत असलेल्या या सोहळ्याला उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यासह मराठी भाषामंत्री सुभाष देसाई, मुंबईचे पालकमंत्री अस्लम शेख, मराठी भाषा राज्यमंत्री डॉ.विश्वजीत कदम, खासदार अरविंद सावंत, आमदार मंगलप्रभात लोढा उपस्थित राहणार आहेत.

मराठी भाषा भवनाचे मुख्य केंद्र दक्षिण मुंबई परिसरात आणि उपकेंद्र ऐरोली, नवी मुंबई येथे बांधण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेतला होता. मराठी भाषा भवन व मराठी भाषा उपकेंद्रांचे बांधकाम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून होणार आहे.


मराठी भाषा भवन मुख्य केंद्र उभारणीकरिता गिरगाव, जवाहर बाल भवन, चर्नीरोड, मुंबई येथील भूखंडावरील शालेय शिक्षण विभागाचे बांधकाम वगळता रिक्त भूखंड विनामोबदला मराठी भाषा विभागास देण्याचा निर्णय झाला आहे. सुमारे २१०० चौ.मी. क्षेत्र मराठी भाषा भवनास मिळणार आहे. अंदाजे १२६ कोटी रुपये एवढा खर्च मराठी भाषा भवन उभारणीसाठी लागणार आहे. मुंबईच्या मे. पी.के. दास ण्ड असोसिएट्स यांची वास्तू विशारद म्हणून निवड करण्यात आली आहे.

# हिंदू नववर्षासाठी बाजारपेठा सजल्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त आणि हिंदु नववर्षाचा पहिला दिवस अर्थात गुढीपाडव्याचा सण आता अवघ्या काही दिवसांवर येवून ठेपला असल्याने यानिमित्ताने शहरातील बाजारपेठा आतापासूनच सजल्या आहेत. गाठी, गुढीचे साहित्य, नवी काठी यासह पाडव्यासाठी लागणारे पुजेचे साहित्य खरेदी करण्यासाठी पनवेल परिसरासह तालुक्यातील मार्केटसह इतर ठिकाणच्या दुकांनांमध्ये नागरिकांची लगबग सुरू झाली असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

दरम्यान, कोरोना महामारीमुळे गेल्या दोन वर्षापासून विविध सणांसह गुढीपाडव्याच्या सणही कोरोनाच्या सावटाखाली नागरिकांना अत्यंत साधेपणाने साजरा करावा लागला होता. मात्र आता कोरोनाचे सावट कमी होण्यासह निर्बंधतेतही शिथीलता आल्याने यंदा गुढीपाडव्याच्या खरेदीसाठी बाजारपेठेत नागरिकांची गर्दी होवू लागली आहे. हिंदू नववर्षाचा पहिला दिवस, चैत्र शुक्ल प्रतिपदा अर्थात



गुढीपाडवा यंदा २ एप्रिल रोजी (रविवारी) साजरा होत आहे. साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त असणाऱ्या गुढीपाडव्याला हिंदू नववर्षाची सुरुवात होते. नव्या वर्षाची सुरुवात पंचांगाचे पूजन करून, वाचन करून केली जाते. त्यामुळे आतापासूनच बाजारपेठेत नागरिकांची सध्या पंचांग खरेदीसाठी, महिलांकडून पूजेचे साहित्य तसेच साखरेच्या गाठ्या, गुढीचे पूजा साहित्य खरेदी होतांना दिसत आहे. पाडव्याला गोड पदार्थ म्हणून अनेकांकडून आंब्यांची खरेदीही केली जात आहे.

गुढीपाडव्याचा खास मान असलेल्या साखरेच्या गाठी या वर्षी विविध रंगांमध्ये उपलब्ध करण्यात आल्या असल्याचे दिसून येते. किमान २० रुपयांपासून ते ७० रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत. गुढीसाठी साडी व इतर वस्तू वापरल्या जात असल्या तरी खास गुढीसाठी भरजरी व खास जडीगाठीच्या साड्या बाजारात उपलब्ध आहेत. छोट्या गुढीचे दर दीडशे ते साडेचारशे पर्यंत असून चुणेरी ७० रुपये तर पित्तळी लोटा साडेतीनशे रुपयांपर्यंत बाजारपेठेत उपलब्ध आहेत.

विशेष म्हणजे बचत गटांनी केलेल्या रेडिमेड गुढ्यांनाही अनेक ठिकाणी पसंती मिळत आहे. टेबलवर, कारमध्ये ठेवता येण्यासारख्या छोट्या गुढीसह मोठ्या रेडिमेड गुढ्याही उपलब्ध आहेत. पाडव्यानिमित्त घरोघरी गोडधोड बेत करण्यासाठी चक्का, श्रीखंड, आम्रखंड, बासुंदी या खाद्य प्रकारांना बाजारात मागणी वाढली असल्याचे दिसून येत आहे.

## संक्षिप्त...

### ईडीच्या कारवाईवरुन नाना पटोले यांचा इशारा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्याचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात कोर्टात खटला दाखल करणारे तसेच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या विरोधातील प्रकरणामध्ये काँग्रेसचे नेते नाना पटोले यांचे वकील असलेल्या ॲड. सतीश उके यांच्या घरी ईडीच्या पथकाने छापा मारला. उके यांच्या नागपूर येथील घरी छापा मारण्यात आला. या छाप्याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. ईडीचे अधिकारी पहाटेपासूनच उके यांच्या घराची झाडाझडती करण्यात आली. त्यानंतर उके यांना ईडीने चौकशीसाठी ताब्यात घेतलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी व देवेंद्र फडणवीस यांच्या विरो-धात पत्रपरिषदेत अनेक पुरावे दिले म्हणून भाजपाने सूडबुद्धीने माझ्या भावावर ही कार्यवाही केली, असा आरोप उके यांच्या भावाने केला आहे. तसेच ईडीने आमच्या घरातून कागदपत्रे नाही, परंतु एक लॅपटॉप आणि तीन मोबाईल घेऊन गेले असल्याची माहिती उके यांच्या भावाने दिली. सतीश उके यांच्या घरी ईडीने छापा टाकल्यानंतर नाना पटोले यांनी भाजपावर निशाणा साधला आहे. भाजपाच्या हिटलरशाहीने लोकशाही धोक्यात असल्याचे नाना पटोले यांनी सांगितले. भाजपच्या अत्याचारी व्यवस्थेविरोधात जो कोणी बोलेल, त्याच्यावर केंद्रीय तपास यंत्रणेचा दुरुपयोग करुन कारवाई करुन तोंड बंद करण्याचं पाप हे भाजप जाणीवपूर्वक करतंय. केवळ सतीश उके प्रकरणातच नाही तर अनेक प्रकरणात अशी कारवाई केली जात आहे, असं नाना पटोले म्हणाले.

## गुढी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर

# सिडकोची भूखंड, सदनिका आणि वाणिज्यिक गाळ्यांच्या विक्रीची महायोजना

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

सिडकोतर्फे गुढी पाडव्याच्या शुभ दिनी दिनांक २ एप्रिल २०२२ रोजी विविध भूखंड, मध्यम उत्पन्न गट आणि उच्च उत्पन्न गटासाठीच्या सदनिका आणि वाणिज्यिक गाळ्यांच्या विक्री महायोजनेचा शुभारंभ मा. श्री. एकनाथ शिंदे, नगरविकास मंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत नवी मुंबईच्या विविध नोडमधील वाणिज्यिक गाळे तसेच निवासी, वाणिज्यिक आणि सामाजिक उद्देशांसाठी भूखंड ई-लिलाव तथा ई-निविदा प्रक्रियेद्वारे विक्रीकरिता उप-लब्ध करून देण्यात येणार आहेत.

> उद्धव बाळासाहेब ठाकरे, मुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली या विविध योजनांच्या माध्यमातून सिडकोने पुन:श्च समाजातील सर्व स्तरांतील नागरीकांसाठी समान संधी उपलब्ध करून दिली आहे. सिडकोने नेहमीच आपल्या विविध योजना व प्रकल्पांच्या माध्यमातून समाजाचा व शहराचा सर्वांगीण विकास साधण्यावर भर दिला आहे. वाणिज्यिक गाळे व वाणिज्यिक भूखंड विक्रीच्या या महायोजनेमुळे कोविड पश्चात रूळावर येत असलेल्या अर्थव्यवस्थेस अधिक गती मिळणार आहे. निवासी भूखंडांमुळे शहरातील बांधकाम क्षेत्राला चालना मिळण्यासह सर्वसामान्यांना घराचे स्वप्न पूर्ण करणे शक्य होणार आहे. तर सामाजिक उद्देशाच्या भूखंडांमुळे विविध समाजोपयोगी उपक्रम वृद्धिंगत होण्यास मदत होणार आहे.
>
> **: एकनाथ शिंदे, नगरविकास मंत्री**

> सदर योजनेंतर्गत नवी मुंबईच्या विविध नोडमधील सिडकोच्या लोकप्रिय गृहनिर्माण योजनांमधील वाणिज्यिक गाळ्यांसोबतच उत्तर व दक्षिण नवी मुंबईतील विविध क्षेत्रफळांचे भूखंड व सिडकोच्या लोकप्रिय गृहनिर्माण योजनेतील सदनिका विक्रीकरिता उपलब्ध करण्यात येणार आहेत. यामध्ये सामान्य नागरिकांपासून मोठ्या विकासकांपर्यंत सर्वांना निवासी, वाणिज्यिक, निवासी तथा वाणिज्यिक भूखंड विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सामाजिक उद्देशांतर्गत रुग्णालय, वृद्धाश्रम, कला आणि सांस्कृतिक केंद्र, विशेष विद्यालय, पशुवैद्यकीय दव-ाखाने, अनाथालय, विद्यार्थी वसतिगृह या सुविधांसाठी भूखंड विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आहेत.
>
> **डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

नवी मुंबईतील खारघर, घणसोली, कळंबोली, तळोजा व द्रोणागिरी नोड्समध्ये या विविध योजना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नवी मुंबईतील मोक्याच्या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आलेल्या वाणिज्यिक गाळ्यांमुळे व्यावसायिकांना व्यवसाय सुरु करण्यासोबतच वृद्धिंगत करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करूण देण्यात येणार आहे. तसेच लहान व मोठ्या आकाराच्या निवासी आणि वाणिज्यिक भूखंडांमुळे बांधकाम विकासकांसह सर्वसामान्य नागरिकांनाही

.../२

# नवीन पनवेल आमले हॉस्पिटलमध्ये लिफ्टला अपघात;९ डॉक्टर जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लिफ्ट मध्ये बिघाड झाल्याने लिफ्ट कोसळून ९ डॉक्टर जखमी झाल्याची धक्कादायक घटना नवीन पनवेलमध्ये घडली आहे.या घटनेत काही डॉक्टरांना गंभीर दुखापत झाली आहे.नवीन पनवेलमधील आमले हॉस्पिटलमध्ये हि घटना घडली .

काही महिन्यांपुर्वी सुरू केलेल्या हॉस्पिटलमध्ये आमले यांनी डॉक्टर मित्रांना गेट टुगेदरसाठी निमंत्रित केले होते. जेवणासाठी तिसऱ्या मजल्यावरून ९ डॉक्टर लिफ्टमध्ये बसून तळमजल्यावर येण्यासाठी लिफ्टमध्ये शिरले. दुसरा मजल्या पर्यंत लिफ्ट व्यवस्थित कार्यान्वित होती , त्यानंतर अवघ्या काही सेकंदात लिफ्ट तळमजल्यावर प्रचंड वेगाने लिफ्ट खाली आपटली. लिफ्टमध्ये उभे असलेले डॉक्टर आतमध्येच अडकून पडले होते. इतर डॉक्टरांनी तातडीने नवीन पनवेल अग्निशमन दलाला कळविले. अवघ्या काही मिनिटांत अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहचून जखमींना त्वरित जखमींना बाहेर काढले. डॉ. संदीप आमले, डॉ. बाळकृष्ण नागरगोजे, डॉ. गोविंद पाटील, डॉ श्रेया वीर,



डॉ. विनोद ढोले डॉ. दिपाली नेरवणे, डॉ. संतोष जायभाय आणि पुणे येथील डॉ. सुरेश नाईक आणि डॉ. वृंदा कक्कर आदी डॉक्टर या घटनेत जखमी झाले आहेत. आमले हॉस्पिटलचे मालक डॉ. संदीप आमले

.../२

# कोप्रोली-चिरनेर रस्त्यावर अपघातात वानराचा जागीच मृत्यू

**दै.रायगड नगरी । उरण**

कोप्रोली- चिरनेर मार्गावरील कोप्रोली हद्दीतील गोदामाजवळ रस्ता ओलांडत असतांना अज्ञात वाहनाच्या धडकेने डोक्याला दुखापत होऊन वानराचा जागीज मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली आहे.या सदरची खबर वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष काशिनाथ खारपाटील यांना मिळताच त्यांनी लगेचच वनरक्ष संतोष इंगोले आणि राजेंद्र पवार यांना दिली असता त्यांनी वाणराचा रीतसर पंचनामा करून कलंबूसरे जंगलात दफन करण्यात आले.

जंगलांना आगी लावून जंगल संपदा समाज कंटकांकडून नष्ट केली जात आहे.त्यामुळे जंगलात प्राण्यांना पक्षांना त्यांचे अन्न मिलेनासे झाले आहे. वन्यजीव अन्नसाठी सैरावर होत आहेत. त्याचप्रमाणे वानरांना ही जंगलात आपले अन्न न मिळाल्याने त्यांनी आपला मोर्चा गावांकडे वळविला आहे. जंगलातून गावाकडे येण्यासाठी वानर प्राण्यांना मोठी वाहतुकीची वर्दळ असणारा रस्ता ओलांडून यावा लागत आहे.

अशाच अन्नाचा शोधत रस्ता ओलांडत असताना कोप्रोली गोदामाजवळ अज्ञान वाहनाच्या धडकेत वाणराचा जागीच मृत्यू झाला त्याला वनविभागाकडून दफन करण्यात आले यावेळी वनरक्षक संतोष इंगोले, वनरक्षक राजेंद्र पवार तसेच वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष ,अध्यक्ष विवेक केणी ,महेश भोईर उपस्थित होते.



# मार्ग मोकळे करा

मुंबईकरांसाठी मेट्रो सेवेचे दोन मार्ग लवकरच चालू होणार असले, तरी घाटकोपर ते अंधेरी ही उपनगरे जोडणारी पहिली मेट्रो सेवा सुरू होऊन आठ वर्षे होत आहेत, हे लक्षात घ्यावे लागेल. अंधेरी ते दहिसर आणि दहिसर ते डीएन नगर असे दोन टप्पे सुरू होणार असले, तरी मुंबईतील वाहतूक सुरळीत होण्यासाठी ते पुरेसे नाहीत. मुंबईतील मेट्रो उभारणीचे मूळ वेळापत्रक याआधीच मागे पडले आहे. त्यातच, कारडेपोची जागा बदलण्याचा निर्णय या सरकारने घेतल्यानेही विलंबात भर पडली. महामुंबईत उपनगरी सेवा, मेट्रो, जलवाहतूक आणि बससेवा यांचा समन्वित विचार करून वेगाने काम होणे अपेक्षित होते. तसे आजही होताना दिसत नाही. मुंबईचे पोलिस आयुक्तपद स्वीकारल्यापासून अनेक आघाड्यांवर वेगाने काम करणारे संजय पांडे हे तर गुंडगिरीपेक्षा वाहतूक कोंडीने मुंबईकर अधिक त्रस्त आहेत, असे म्हणत आहेत. वाहतुकीचा विचार करताना, केवळ मुंबईचा विचार न करता ठाणे, पालघर, रायगड हे आसपासचे जिल्हे आणि त्यांच्यातील झपाट्याने वाढती शहरे यांची दखल घ्यावी लागते. या संपूर्ण परिसरात मेट्रोचे दहाहून अधिक मार्ग प्रस्तावित असले, तरी त्यांचे काम वेगाने चालू नाही. मुंबई महापालिकेने हाती घेतलेला किनारी मार्ग किती वेगाने पुढे जातो आहे, याच्या बातम्या येत असतात. तो नेमका कधी पुरा होणार आणि किती हजार मुंबईकरांना त्याचा लाभ होणार आहे, हे मात्र कळायला मार्ग नाही. आता दक्षिण मुंबईतील रहिवाशांच्या संघटनांनी या रस्त्याच्या कामावर आक्षेप घेतला आहे. 'युनेस्को'ने वारसा परिसर म्हणून या भागाला दिलेल्या मान्यतेत या रस्त्याच्या कामामुळे बाधा येईल, अशी त्यांची तक्रार आहे. मुंबईचे सौंदर्य या रस्त्यामुळे उणावते, या कारणासाठी त्यांनी उद्या न्यायालयात धाव घेतली, तर नवाच पेच निर्माण होऊ शकतो. महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार आणि केंद्रात भारतीय जनता पक्षाचे सरकार, अशी स्थिती आल्यापासून गेल्या जवळपास तीन वर्षांमध्ये महाराष्ट्रातील; विशेषकरून महामुंबईतील सर्व प्रकारच्या वाहतूक कामांवर विपरीत परिणाम होतो आहे. मेट्रोच्या कारडेपोचा वाद हे त्याचे उदाहरण आहेच; पण इतरही अनेक बाबतींत दोन्ही सरकारे जनहितासाठी परस्परांशी सहकार्य करण्याच्या भूमिकेत नाहीत, असे दिसते. 'मुंबई रेल्वेविकास कॉर्पोरेशन' या राज्य व केंद्र सरकार यांच्या भागीदारीने बनलेल्या कंपनीचा कारभार, हे याचे उदाहरण म्हणावे लागेल. वेगाने निर्णय आणि अंमलबजावणी होऊन रोज घराबाहेर पडणाऱ्या ७० ते ८० लाख महामुंबईकरांचे जीवन थोडे तरी सुखावह व्हावे, अशी ही कंपनी स्थापन करण्यामागची भूमिका होती. आज महाराष्ट्र सरकार या कंपनीला ठरल्याप्रमाणे एक हजार कोटी रुपये द्यायला तयार नाही, असे म्हटले जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील 'बुलेट ट्रेन'चे मध्यवर्ती आधुनिक स्थानक वांद्रे-कुर्ला संकुलात (बीकेसी) होणे, अपेक्षित होते. त्यासाठी राज्याने केंद्र सरकारला जागा दिली की नाही, हे कळायला मार्ग नाही. मोदींच्या पहिल्या कार्यकाळात घोषणा झालेली ही बुलेट ट्रेन प्रत्यक्षात कधी धावणार कुणास ठाऊक. काही नेत्यांनी टीका केल्याप्रमाणे बुलेट ट्रेन हे समजा अतिरंजित किंवा श्रीमंती अनावश्यक स्वप्न असेल. मग निदान मुंबईत रोज जीवन-मरणाची लढाई करून प्रवास करणाऱ्या लक्षावधी लोकल प्रवाशांना तरी लवकर दिलासा द्यायला हवा. 'एमयूटीपी' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या कामाचे पुढचे तीन टप्पेच ५० हजार कोटी रुपयांहून अधिक रकमेचे आहेत. ते कधी पुरे होणार, या प्रश्नाचे उत्तर आज ना केंद्र सरकारकडे आहे, ना राज्य सरकारकडे. यातली तातडीची कामे म्हटली, तरी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कुर्ला स्टेशन हा पूर्ण सहा पदरी मार्ग सुरू होण्याची नितांत गरज आहे. ही योजनाही आजची नाही. ती कधी पुरी होणार? तीच गत पश्चिम रेल्वेवरील मुंबई सेंट्रल ते बोरिवली हा पट्टा सहा पदरी करण्याच्या प्रकल्पाची आहे. सगळ्या अडचणी युद्ध पातळीवर सोडवून ही कामे पुरी का होत नाहीत? आज मुंबई ज्या वेगाने वाढते आहे, ते पाहता विरार-डहाणू चौपदरीकरण, पनवेल-कर्जत कार्यक्षम उपनगरी सेवा, हार्बर मार्गाचा बोरिवलीपर्यंतचा विस्तार अशी असंख्य कामे त्वरेने होण्याची गरज आहे. कोट्यवधी रुपये खर्चून दिखाऊ कामे करण्यापेक्षा महामुंबईकरांचे जीवन सुसह्य करणारी ही कामे मार्गी लावणे अधिक महत्त्वाचे आहे; पण याची फिकीर केंद्र सरकार, राज्य सरकार आणि मुंबई महापालिका या कुणालाही नाही. महामुंबईच्या वेगवान आणि कार्यक्षम वाहतुकीचा विचार करताना उत्तम रस्ते, पूल, उपनगरी सेवा, मेट्रो सेवा, जलवाहतूक आणि 'बेस्ट'सहित सर्व शहरांमधील बस सेवा, एसटी या साऱ्यांचा एकत्रित विचार करून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने कार्यक्षम सेवा देण्याची गरज आहे. आज अशी कोणतीही ठोस दिशा नाही, अचूक नियोजन नाही आणि झालेल्या नियोजनाची अंमलबजावणीही नाही. हा महामुंबईकरांचा छळ नेमका कशासाठी होतो आहे?

# जासई हायस्कूल प्राचार्य अरुण घाग यांना आंतरराज्य आदर्श प्राचार्य गौरव पुरस्कार

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील जासई रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनियर कॉलेज जासईचे प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण शंकर घाग यांना नॅशनल रूरल डेव्हलपमेंट फाउंडेशनचा मानाचा समजल्या जाणाऱ्या आंतरराज्य आदर्श प्राचार्य गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. गोवा कर्नाटक आणि महाराष्ट्र या राज्यातील निवडक व्यक्तींची निवड आंतरराज्य पुरस्कार वितरण समितीने करून हा पुरस्कार त्यांना देण्यात आला.

कर्नाटकातील बेळगाव- चिक्कोडी येथे भारताच्या मा.केंद्रीय मंत्री श्रीमती रत्नमाला सावनुर व बेळगावचे खासदार बॅरिस्टर श्री.अमरसिंह पाटील यांच्या शुभ हस्ते प्रदान करण्यात आला.त्या प्रसंगी कोल्हापूरचे मा.महापौर श्री.रावजी शिंगाडे,माळशिरस चे नगराध्यक्ष श्री.अप्पासाहेब देशमुख,श्री अरविंद घट्टी जिल्हा कमांडंट होम गार्ड डिपार्टमेंट कर्नाटक सरकार,आदी.मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

अरुण घाग हे रयत शिक्षण संस्थेमध्ये गेली ३३ वर्षे अविरतपणे अध्यापनाची सेवा करत आहेत. महाराष्ट्रातील गोरगरीब कष्टकरी, शेतकरी आणि बहुजन समाजातील लोकांच्या झोपडीपर्यंत ज्ञानाची गंगा पोहोचविण्यासाठी थोर शिक्षण महर्षी, डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून महाराष्ट्रात शिक्षणाची क्रांती घडवून आणली. कर्मवीरांच्या विचारांचा वसा घेऊन जासई येथे अरुण घाग हे प्राचार्य म्हणून काम करत आहेत, त्यांनी या शैक्षणिक संकुलाच्या विकासासाठी जे योगदान दिले आहे तसेच त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याची नोंद हा पुरस्कार देताना घेण्यात आली आहे.

या शाळेत त्यांनी आपल्या कारकीर्दीत विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्याच्या सोयीसाठी पाणपोईची उभारणी केली, विद्यालयाच्या प्रांगणात स्टेज उभारणी केली आहे ,अटल टिंकरिंग लॅब ची उभारणी केली, प्रशासकीय कामासाठी प्रशस्त कार्यालय निर्माण केले, विद्यालयाच्या वाढत्या विद्यार्थी संख्येनुसार सुरू असलेल्या इमारतीचे काम वेगाने पूर्ण केले. त्याच बरोबर सर्व शालेय परिसर स्वच्छ सुंदर व शैक्षणिक वातावरण निर्माण करून आपल्या सर्व सहकाऱ्यांच्या सहकार्याने शाळेची शैक्षणिक वाटचाल विकासाकडे सुरू ठेवली आहे. त्यांच्या या सन्मानाबद्दल जासई दहागाव विभागातील शिक्षणप्रेमी नागरिक, ग्रामस्थ, शिक्षक - पालक व सर्व विद्यार्थी वर्गाने त्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



# सुवर्णा बाळू पाटील हिची पोलीस उपनिरीक्षकपदी नियुक्ती

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

संघर्ष करण्याची संधी त्यांनाच मिळते ज्यांच्या मध्ये क्षमता असते व त्याग आणि परिश्रम केल्याशिवाय कोणतेही कार्य यशस्वी होत नाही हे वाक्य सत्यात उतरवणारी आंबेवाडी नाका येथील राहणारे जे. बी. पाटील सर यांच्या भावाची मुलगी मूळ गाव नेवाडे ता.सिंदखेडा येथील कु.सुवर्णा बाळू पाटील यांची पोलिस उपनिरीक्षक पदी निवड झाली आहे



कु. सुवर्णा बाळू पाटील हिने एम.पी. एस. सी परीक्षा २०१९ रोजी दिली होती.या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून यामध्ये सिंदखेडा तालुक्यातील सुवर्णा हिने ओबीसी गटातून २१ वा क्रमांक मिळवून तिची महाराष्ट्र पोलिस दलात पोलीस उपनिरीक्षक पदावर निवड करण्यात आली आहे.तीचे आई वडील मोलमजुरी करून उदरनिर्वाह करीत आहेत परंतु मी माझ्या मामाच्या सहकार्यामुळे मी एवढी भरारी घेऊ शकलो असे मत पत्रकारांशी बोलताना सुवर्णा हिने व्यक्त केले आहे

तीच्या अभ्यासपुर्ण मेहनतीला यश आले असून त्यांच्या नेवाडे गावात पहिलीच मुलगी पी. एस. आय.पदाकरता नियुक्ती झाल्याबद्दल संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण आहे.त्यांच्या कुटूंबात व समाजात प्रेरणादायी गोष्ट ठरली असल्याचे संपूर्ण तालुक्यासह त्यांच्या पुर्ण गावात आनंदाचे वातावरण असून कठीण परिस्थितीत स्वतःचे ध्येय न विसरता यशाचे शिखर गाठणाऱ्या सुवर्णाचे विविध क्षेत्रातुन अभिनंदन करण्यात आले असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# नाडसुर केंद्राची शिक्षण परिषद उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

नाडसुर केंद्राची शिक्षण परिषद केंद्र शाळा नाडसुर येथे मंगळवारी (ता.२९) संपन्न झाली. यावेळी बहिरमपाडा शाळेच्या बिजांकुरण या हस्तलिखिताचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या शिक्षण परिषदेमध्ये नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती, भाषा व समाज शास्त्र, थोरांची ओळख, माझा नवा उपक्रम, सीसीई मूल्यमापन, तालुका स्तरीय उपक्रम आदि विविध विषयांवर तज्ञांनी मार्गदर्शक केले.

तसेच राजिप बहिरमपाडा शाळेच्या बिजांकुरण हस्तलिखिताचे प्रकाशन नाडसुर केंद्राच्या केंद्रप्रमुख कल्पना पाटील, मुख्याध्यापक अनिल राणे व बहिरमपाडा शाळेचे मुख्याध्यापक अमोल पाटील व शिक्षिका आशाताई इप्पर यांच्या हस्ते करण्यात आले. या आकर्षक, सचित्र व माहितीपूर्ण हस्तलिखित मध्ये विद्यार्थ्यांनी संग्रहित केलेल्या कविता, प्रार्थना व लेखांचा देखील समावेश केला आहे.

गटशिक्षणाधिकारी शिल्पा दास यांच्या प्रेरणेने व बहिरमपाडा शाळेतील विद्यार्थी आणि शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांच्या सहकार्याने मुख्याध्यापक पाटील व उप शिक्षिका इप्पर यांनी हे आकर्षक व माहितीपूर्ण हस्तलिखित तयार केले आहे. यावेळी नाडसूर केंद्रातील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

या हस्तलिखितात तालुका, जिल्हा, राज्य व देशाचा नकाशा तयार केला आहे. हस्तलिखितात ताणतणावांचे व्यवस्थापन कसे करावे याबाबत माहिती दिली आहे. तसेच शाळेत वर्षभर राबविलेले उपक्रम, शाळा बंद पण शिक्षण सुरू आदी महत्वपूर्ण माहिती दिली आहे. विविध शब्द खेळ व विषयनारूप माहीती आदींचा सचित्र समावेश हस्तलिखित मध्ये आहे. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळण्यासाठी हस्तलिखित एक प्रभावी साधन आहे असे मान्यवरांनी सांगितले.


## पनवेल महानगरपालिका, पनवेल
### ई-निविदा सूचना
### विद्युत विभाग

मा.आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब-१ नमुन्यातील खालील कामाची निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील विद्युत विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदाराकडून मागविण्यात आली आहे.

| अनु क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय (GST सोडून) | निविदा अनामत रक्कम (रु.) | कोरी ई निविदा किंमत (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पमपा/ वि.वि./ ३४/२०२२ | पनवेल महानगरपालिका मालकीच्या अग्नीशमन इमारत, आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके, नाट्यगृह, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, मलिनिःस्सारण प्रक्रिया केंद्र, व स्व.विलासराव देशमुख, शॉपिंग कॉम्प्लेक्स या ठिकाणी सोलार यंत्रणा राबविणे | १,२३,१४,१९६.०० | १,२३,१४२.०० | १,१८०/- |

या निविदेबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिका संकेत स्थळ https://mahatenders.gov.in या साईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याची सर्व संबंधित निविदा धारकांनी नोंद घ्यावी.

**जा.क्र./पमपा/विद्युत/२०२२/प्र.क्र.२३/२५५/२०२२**
**दिनांक : ३१/०३/२०२२**

**सही/-**
**विद्युत विभाग प्रमुख**
**पनवेल महानगरपालिका**


# पनवेल तालुका पोलिसांनी केले सेंट विल्फ्रेड कॉलेज ऑफ लॉ येथील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील शेडुंग फाटा येथे असलेल्या सेंट विल्फ्रेड कॉलेज ऑफ लॉ येथील विद्यार्थ्यांना पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि रवींद्र दौंडकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी पोलीस ठाण्यातील चालणाऱ्या कामकाजासंदर्भात मार्गदर्शन केले.

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०२ व सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार कम्युनिटी पोलिसिंग पत्रकाप्रमाणे शाळा व कॉलेज यांच्या विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडीअडचणी बाबत, त्यांना गुड टच- बॅड टच बाबत, अमली पदार्थ व व्यसनापासून दूर राहणे बाबत, महिलांच्या लैंगिक सुरक्षेच्या संदर्भात अडीअडचणी बाबत, अशा विविध विषयाबाबत पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील सेंट विल्फ्रेड कॉलेज ऑफ लॉ शेंडूग या कॉलेज मधील विद्यार्थी ९० व विद्यार्थीनी ८० असे एकूण १७० विद्यार्थी यांना पोलीस ठाण्यात बोलावून त्यांना मार्गदर्शन करून त्यांना योग्य त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच सर्व विद्यार्थ्यांना पोलीस ठाण्यातील दैनंदिन कामकाजाबाबत सुद्धा सविस्तर मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

सदरवेळी सेंट विल्फ्रेड कॉलेज ऑफ लॉ मधील प्राचार्य डॉ. मृत्युंजय पांडे, डॉ. रामदान यादव , आर. सी. राय, श्रीमती.स्नेहा वायकर, श्रीमती. जमुना शर्मा व विद्यार्थी व विद्यार्थिनी हजर होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## राज्यात 'रेडी रेकनर'च्या दरात सरासरी ८.८० टक्के वाढ

तर एकूण दरवाढ ८.८० टक्के इतकी असणार आहे. बृहन्मुंबई क्षेत्रातील सरासरी वाढ २.३४ टक्के इतकी आहे. पण यामध्ये मुंबईचा समावेश करण्यात आलेला नाही. याआधीच नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने २०२२-२३ वर्षासाठी राज्यात रेडी रेकनर म्हणजे जमिनीच्या वार्षिक बाजारमूल्य दरात वाढ प्रस्तावित केली होती. यासाठी शासनाची मान्यता मिळणे अपेक्षित होते. आता राज्य शासनाच्या मंजूरीनंतर सर्व जिल्ह्यांच्या नोंदणी व मुद्रांक विभागाकडून या नव्या रेडी रेकनरच्या दराची अंमलबजावणी होणार आहे.

## सिडकोची भूखंड, सदनिका आणि वाणिज्यिक गाळ्यांच्या विक्रीची महायोजना

आपले हक्काचे घर साकारण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विविध सामाजिक उद्देशांकरिता मोठ्या प्रमाणावर भूखंड उपलब्ध करून देत सिडकोने आपला सर्वसमावेशक आणि समाजाच्या सर्वांगीण विकासाचा वारसा जपला आहे. याचबरोबर सिडकोच्या लोकप्रिय गृहनिर्माण योजनांमध्ये मध्यम उत्पन्न गट व उच्च उत्पन्न गटासाठी सदनिका विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

सदर योजनेतील वाणिज्यिक गाळ्यांची आणि भूखंडांची विक्री ही सुलभ आणि पारदर्शक अशा ई-निविदा तथा ई-लिलाव प्रक्रियेद्वारे पार पडणार आहे. याकरिता https://cidco.maharashtra.gov.in हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. अर्ज नोंदणी, अनामत रक्कम व शुल्क भरणा, निविदा सादर करणे, लिलाव या सर्व प्रक्रियेची माहिती उपरोक्त संकेतस्थळासोबतच सिडकोच्या अधिकृत समाज माध्यमांवर वेळोवेळी देण्यात येईल. सिडकोतर्फे आवाहन करण्यात येते की जास्तीत जास्त नागरीकांनी, लघु उद्योजक व विकासकांनी या सुवर्णसंधीचा मोठ्या प्रमाणावर लाभ घ्यावा.

## नवीन पनवेल आमले हॉस्पिटलमध्ये लिफ्टला अपघात;९ डॉक्टर जखमी

यांच्या डाव्या पायाला सर्वांत जास्त दुखापत झाली आहे. घटनेनंतर जखमी डॉक्टरांना पनवेलमधील खाजगी रुग्णालय रूग्णालय, नवी मुंबईतील अपोलो रूग्णालय याठिकाणी उपचारासाठी दाखल केले होते.खांदेश्वर पोलीस ठाण्यात घटनेची नोंद करण्यात आली आहे.


## जाहीर नोटीस

आमच्या अशिलांच्या सौ.धनश्री प्रकाश निघुकर रा.पेंधर, ता.पनवेल, जि.रायगड यांनी श्री.शांताराम बाळू पाटील रा.तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड यांची खालील मिळकत कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याचे मान्य केले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : घोट, ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे | भूधारणा पद्धती | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| घोट, ता.पनवेल, जि.रायगड | वर्ग-१ | ५२ | ३ | ०-११-० |
| | | ५५ | ६/७/अ | ०-१२-४० पो.ख.०-०१-३० |
| | | ५५ | ६/७/ब | ०-०९-४० पो.ख.०-००-२० |
| | | | एकूण क्षेत्र | ०-३४-०३ |

तरी वरील मिळकती बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा-कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अॅटॅचमेंट, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १७ दिवसांच्या आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अथवा प्रत्यक्ष संपर्क करावा. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील आणि वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.३१/०३/२०२२

**सही/-**
**अॅड.शशिकांत काळु म्हात्रे**
**पायोनिअर सोसायटी, ग्राऊंड फ्लोअर, स्वामी नित्यानंद रोड, युविक हॉटेलजवळ, पनवेल-४१०२०६**
**मो.नं.८६५२७५७५४८**



Mujawar Court

Adv.Mayur M. Mohite

## PUBLIC NOTICE
**IN THE COURT OF HON'BLE C.J.J.D. PANVEL, AT PANVEL**

Misc. Application No. 444 of 2022
Exh. : 8/D
Next Date : 04/05/2022

**MR.SANJAY KISAN BHOJANE**
Age 45 yrs, Indian Inhabitant
Occ-service, Residing at : bhosale chawal 1/8 R B Kadam Marg Near Ganesh Mandir Bhatwadi Ghatkopar West Mumbai Barve Nagar Mumbai Maharashtra-400084 Applicant

Versus

**1) MRS.GOJARABAI KISAN BHOJANE**
Age 62 yrs, Indian Inhabitant, Occ-housewife
**2) MR.AJAY KISAN BHOJANE**
Age 42 yrs, Indian Inhabitant, Occ-working
**3) MRS.SAVITA KISAN BHOJANE**
Age 38 yrs, Indian Inhabitant, Occ-housewife
**4) MR.KALPESH KISAN BHOJANE**
Age 32 yrs, Indian Inhabitant, occ-working
**5) MR.CHETAN KISAN BHOJANE**
Age 28 yrs, Indian Inhabitant, Occ-working
All Residing at : bhosale chawal 1/8 R B Kadam Marg Near Ganesh Mandir Bhatwadi Ghatkopar West Mumbai Barve Nagar Mumbai Maharashtra-400084 Opponents

1) That Mrs.Kisan Shkharam Bhojane died on 18.05.2021 (hereinafter referred to as "The said Deceased"). The applicant is the son of the deceased. The late Mr.Kisan Shkharam Bhojane was owner of the below mentioned property.

2) The Property of deceased Mr.Kisan Shkharam Bhojane is located at EWS, Apartment No.306, floor 3 rd, building No.E-14, sector 36, Kharghar District-Raigad. Carpet area 28.630 Sq. Mtrs. layout of land situated at Sector No.36 Node Kharghar, Navi Mumbai. being situated and lying at Kharghar, Navi Mumbai, Tal Panvel, Dist Raigad.

3) Whereas the above named Applicant has filed Misc Application for Heirship Certificate under Bombay Regulation VIII of 1827, the Court of Civil Judge (SD) Panvel, at Panvel.

4) You the member of Public are hereby given public notice to appear in the Court of Civil Judge (SD) Panvel, At Panvel, in person or by pleader duly instructed and to file your say/objection if any within 30 (thirty) days from the date of publication of this public notice Failing which said application will be held presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided.

Given under hand and seal of the court this 31/03/2022.

Sd/- Jr.Clerk Civil Court Panvel | Court Seal | Sd/- Asst.Superitendt. Civil Court Panvel


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# विभागीय माहिती कार्यालयाचे राजेंद्र मोहिते यांना सेवानिवृत्ती निमित्त निरोप



**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

कोकण विभागीय माहिती कार्यालयातील गेल्या ३५ वर्षापासून यशस्वीपणे सेवा देणारे वरिष्ठ लिपिक राजेंद्र भार्गव मोहिते हे आज दि.३१ मार्च २०२२ गुरुवार रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवापूर्ती निमित्त विभागीय माहिती कार्यालयात छोटेखानी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांना विभागीय माहिती कार्यालयातील, कर्मचारी आणि कोकण विभागातील पत्रकारांनी स्नेह, प्रेमपूर्वक निरोप देऊन पुढील भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कोकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ. गणेश मुळे यांच्या हस्ते सेवानिवृत्त वरिष्ठ लिपिक श्री.राजेंद्र मोहिते यांचा यथोचित सत्कार आणि गौरव करून त्यांना भेटवस्तू देण्यात आल्या. प्रमुख पाहुणे म्हणून अशोक पाटील, डी.बी.पाटील आणि राजेंद्र शिरसाठ यांची उपस्थिती होती. याप्रसंगी कोकण भवनचे वैद्यकीय अधिकारी डॉ. गणेश धुमाळ, नवीमुंबई प्रेस क्लबचे अध्यक्ष मनोज जालनावाला, दै.वादळवाराचे संपादक विजय कडू, श्री.मोहिते यांच्या पत्नी सौ.ऋता मोहिते, कन्या नेहा साळवी आणि जावई सिध्देश साळवी तसेच परिवारातील इतर सदस्य, कोकण भवनातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी श्री.मोहिते म्हाणाले की, २१ फेब्रूवारी १९८६ रोजी विभागीय माहिती कार्यालयाच्या सेवाकार्यात पाऊल ठेवले एकंदरीत माझ्या संपूर्ण सेवाकार्यकाळात मला माझ्या सर्व अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी व पत्रकार तसेच लोकप्रतिनिधी यांचे कडून मिळालेल्या सहकार्यामुळे माहिती खात्याला चांगल्या प्रकारे सेवा देण्याचा प्रयत्न केला आहे. सेवानिवृत्त होत असताना मी माझ्या सेवाकाळात लाभलेल्या सर्व सहकाऱ्यांचे आभार व्यक्त करतो, प्रत्येक कार्यात आपण सर्वांनी दिलेले प्रोत्साहन मार्गदर्शन व अनमोल अशी केलेली मदत या बद्दल मी आपला सर्वांचा ऋणी राहील आपण माझ्या पुढील आयुष्यासाठी ज्या सुयश शुभेच्छा दिल्या. त्याबद्दल मी सर्वांचे आभार व्यक्त करतो.

याप्रसंगी उपस्थित मान्यवर, मित्रवर्ग, सहकारी अधिकारी/कर्मचारी तसेच कुटुंबातील सदस्यांनी श्री.मोहिते यांच्याबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माहिती सहायक प्रविण डोंगरदिवे यांनी आणि सूत्रसंचालन प्रतिक्षा कांबळे यांनी केले. श्री.राजेंद्र मोहिते यांना सेवानिवृत्ती निमित्त कोकण विभागातील सर्वस्तरातून शुभेच्छा देण्यात आल्या.

# पेण फेस्टिवल : डोंबिवली येथील सौ.सपना म्हात्रे मिसेस रायगडच्या विजेत्या



**दै.रायगड नगरी । पेण**

सर्वांसाठी सर्वकाही अशी ख्याती असलेल्या स्वररंग पेण फेस्टिवल मध्ये बुधवारी झालेल्या मिसेस रायगड स्पर्धेत डोंबिवलीच्या सौ.सपना म्हात्रे यांनी मिसेस रायगडचे विजेते पद पटकावले. तर कल्याणच्या सौ.स्वाती रवींद्र जुवारे यांनी उपविजेते व रोह्याच्या सौ.रितिका राकेश भास्कर यांनी तृतीय क्रमांकाचे पारितोषिक जिंकले.

तसेच या स्पर्धेतील बेस्ट कॉस्टयूमच सौ.कृतिका अजिंक्य सुटे (रोहा), बेस्ट स्माईल सौ.पूर्णिमा योगेश प्रधान (पेण), बेस्ट पर्सनॅलिटी सौ.कांचन कुंदन म्हात्रे (पाटणेश्वर–पेण), बेस्ट फोटोजनिक सौ. अनुराधा राज (पेण), बेस्ट हेअर सौ.रुपम लाभेश पाटील (अलिबाग), बेस्ट कॅटवॉक सौ.साक्षी सिद्धेश देवरुखकर (अलिबाग) या स्पर्धकांनी पारितोषिके देऊन सन्मान करण्यात आला.

विजेत्यांना स्वररंगचे अध्यक्ष प्रा.राजेंद्र साळवी, खजिनदार भारती साळवी, स्वररंगचे उपाध्यक्ष सुनिल पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक मीनल शिंदे, सचिव कौस्तुभ भिडे, स्नेहल सावंत, कविता झेमसे, समीर घासे, किरण गुरव, पेण प्रेस क्लबचे अध्यक्ष देवा पेरवी, अनिरुद्ध पवार, सारिका पाटील, शाल्मली भिडे, अक्षता साळवी, संदेश वर्तक, यश बांदिवडेकर, प्रेरणा रामधरणे, प्रसाद म्हात्रे, सुनिल तोंडलेकर, तन्मय शिर्के, आदी मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. इंट्रोडक्शन राऊंड आणि आणि ट्रॅडिशनल साडी राउंड अश्या दोन राउंड मध्ये कोरिओग्राफर शैलेश साळुंखे (रोहा) यांनी साकारलेल्या या स्पर्धेत सर्वच सौभाग्यवती स्पर्धकांनी आपल्या कला नैपुण्याचे उत्तम प्रदर्शन केले. मुंबई येथील निवेदक परेश दाभोळकर यांच्या उत्तम समालोचनाची साथ या स्पर्धेला लाभली. स्पर्धेसाठी परिक्षक म्हणून स्नेहल सुरेश सावंत, कविता झेमसे यांनी काम पाहिले. या स्पर्धेत डोंबिवली, ठाणे, पुणे, कल्याण, अलिबाग, न्यु पनवेल, खारेगाव–कळवा, उरण, पेण, रोहा, बोरिवली, कुर्ला आदि विविध भागांतील एकूण १९ सौभाग्यवती सहभागी झाल्या होत्या. या स्पर्धेला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# अंमली पदार्थ जवळ बाळगणाऱ्या आरोपींस सश्रम कारावास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गांजा हा विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतुक करणार्या दोघाजणांना अतिरिक्त सत्र न्यायाधीश राजेश अस्मर यांनी १३ वर्षे सश्रम कारावास आणि प्रत्यकी दीड लाख रुपये दंड न भरल्यास २ वर्ष कैद अशी सजा सुनावली.

दि. २१ मार्च २०१८ रोजी महेश व्हटकर आणि संताजी मल्हारी खरात हे दोघे ७३ लाख ६६ हजार रुपये किमतीचा ३७७ किलो वजनाचा गांजा हा अमली पदार्थ विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगून वाहतुक करत होते. मालमत्ता व अमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा नवी मुंबई यांनी सदर आरोपींना ताब्यात घेतले आणि गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनाव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ (एनडीपीएस) अधिनियम, १९८५ चे कलम ८(क) २०, २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. या खटल्याची सुनावणी अति सत्र न्यायाधीश १ राजेश अस्मर यांच्या समोर झाली. या प्रकरणामध्ये सरकारी पक्षातर्फे शासकीय अभियोक्ता अॅड. भूषण साळवी यांनी एकुण ५ साक्षीदारांची साथ नोंदविली. सदर केसमध्ये तपासिक अंमलदार राणी काळे व पोलिस निरीक्षक सुनिल बाजारे आणि साक्षीदार रमेश उतगीकर यांनी साक्ष महत्व–ाची ठरली. यामध्ये फितुर झालेले साक्षीदार योगेश पाटील यांची सरकारपक्षामार्फत फितुर झाल्यावर त्याचा उलटतपास घेण्यात आला होता त्याचा विचार निकालपत्रात करण्यात आला आहे. जिल्हा सरकारी वकील तथा शासकीय अभियोक्ता अॅड भूषण साळवी यांनी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिर्णय दाखल करून प्रभावीपणे युक्तिवाद केला. त्यामध्ये आरोपाचे कृत्य हे समाजास हानिकारक असल्याकारणाने त्यांना शिक्षा देवून योग्य तो संदेश समाजात जाणे आवश्यक आहे असा युक्तिवाद न्यायालयाने ग्राहय धरला आणि दोन्ही आरोपीस न्यायालयाने १३ वर्षे सश्रम कारावास आणि प्रत्येकी १ लाख ५० हजार रुपये दंड न भरल्यास २ वर्ष कैद अशी सजा सुनावली.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे करारनामा/वाटपपत्र प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र / करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी/ करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी/ करारनामा संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **नोड - रोडपाली** | | | | |
| १ | ३८ | रोडपाली १२३<br>रोडपाली ३७ | १६२/१<br>१६२/२ | ०-७८-४<br>१-५७-६ | **२०५० चौ.मी. पैकी १८०६.९२ चौ.मी.** | **मौजे-रोडपाली,भूखंड क्र.१०, सेक्टर-१०-E, क्षेत्र १८०६.९२ चौ.मी.** | श्री. तुळशीराम भगवान पाटील | निरंक |
| | | | **एकूण संपादित क्षेत्र** | **२-३६-०** | | | | |
| २ | १७१ | रोडपाली १२७+३ | ६०/०पै | ०-०३-३ | अल्पभुधारक म्हणुन प्रत्येकी ४० चौ.मी. | मौजे रोडपाली (कळंबोली नोड), भूखंड क्र.९/१८, सेक्टर-२०, क्षेत्र-४०.०४ चौ.मी. | १. श्री. सुनिता राजु कोळी उर्फ सुनिता त्रिंबक कडके | निरंक |
| | | | | | | मौजे रोडपाली (कळंबोली नोड), भूखंड क्र.९/२७, सेक्टर-२०, क्षेत्र-४०.०४ चौ.मी. | **कै. निर्मला त्रिंबक कडके उर्फ निर्मला नारायण कोळी (मयत) यांचे वारस**<br>जितेश नारायण कोळी | |
| | | | **एकूण संपादित क्षेत्र** | **०-०३-३** | | | | |
| | | | | **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | |
| ३ | खारघर १११ | ओवे ५६९ | २७२/१ | ०-२३-८ | २०० चौ.मी. | **भूखंड क्र.१३, सेक्टर-६, क्षेत्र-१५० चौ.मी.** | **कै. सोंग्या गोपाळ म्हात्रे (मयत) यांचे वारस**<br>**१) कै. कृष्णा सोंग्या म्हात्रे (मयत) यांचे वारस**<br>१.१) श्रीमती गंगाबाई कृष्णा म्हात्रे<br>१.२) श्री. चंद्रकांत कृष्णा म्हात्रे<br>२) श्री. जनार्दन सोंग्या म्हात्रे<br>३) श्री. ज्ञानेश्वर सोंग्या म्हात्रे | निरंक |
| ४ | खारघर ६४० | ओवे खारघर ३४७ | ३२८/८ | ०-२७-४ | २५० चौ.मी. | **भूखंड क्र.३१, सेक्टर-३३, क्षेत्र-२४९.८५ चौ.मी.** | **कै. महमुदमिया मो. इब्राहीम पटेल (मयत) यांचे वारस -**<br>१) मो.शफी महमुदमिया पटेल<br>२) रफिउद्दीन महमुदमिया पटेल<br>३) अब्दुल सत्तार महमुदमिया पटेल<br>४) मो. नासिर महमुदमिया पटेल<br>५) सुगराबिबी इब्राहीम पटेल<br>६) सुरेय्या मो. खालिद पटेल<br>७) शेरबानो अब्दुल रज्जाक पटेल | निरंक |
| ५ | उलवे १५७ | तरघर १५३ब<br>उलवे २८१/३ | ७/७पै<br>१०/६पै<br>९२/१३ पै | ०-३३-०<br>०-१७-८<br>०-१०-० | ५५० चौ.मी. | **येथे भूखंड क्र.२६६, सेक्टर-१९, क्षेत्र-५५० चौ.मी.** | १. लहू चांगू म्हात्रे<br>२. बाळाराम चांगू म्हात्रे<br>**३. कै. नारायण चांगू म्हात्रे (मयत) तर्फे वारस**<br>वसंत नारायण म्हात्रे | निरंक |
| ६ | उलवे १७८ | न्हावे ३० | अ/७२<br>अ/३२० | ०-५६-०<br>०-२४-० | ७०० चौ.मी. | भूखंड क्र. ९, सेक्टर-२१, क्षेत्र १५९९.३९ चौ.मी. | १. विजय कृष्णा म्हात्रे<br>२. जयराम कृष्णा म्हात्रे<br>३. महेंद्र कृष्णा म्हात्रे | निरंक |
| | उलवे ५७२ | गव्हाण २३ | ४५/६<br>४७/९ | ०-९-४<br>०-२५-३ | ३०० चौ.मी. | | १. जयाबाई नरेश अजाणे<br>२. भारती गणेश कोळी<br>३. आकाश अनंत कोळी | |
| | उलवे ७०३ | न्हावे २२१ | अ/१२५<br>१अ/७१ | ०-१८-०<br>०-११-१ | २५० चौ.मी. | | १. मनोज हरी ठाकूर<br>२. अनिल हरी ठाकूर<br>३. निलेश हरी ठाकूर<br>४. उपासना हरी ठाकूर<br>५. यशवंत पंढरीनाथ मढवी | |
| | उलवे १२७२ A | बंबावी SR २/१० | ५४/४<br>२९/६<br>१४/६ | ०-३८-६ | ३५० चौ.मी. | | १. जयराम जनार्दन गायकवाड<br>२. प्रभाकर जनार्दन गायकवाड | |
| | | | **एकत्रिकरणाद्वारे मंजूर पात्रता चौ.मी.** | | **१६०० चौ.मी.** | | | |
| | | | | **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | |
| ७ | तळोजा १००२ | तळोजा पाचनंद २१७ | २३४/३ | ०-२१-० | २०० चौ.मी. | **भूखंड क्र. २A, सेक्टर-१८, क्षेत्र-२०० चौ.मी.** | सह. दुय्यम निबंधक, पनवेल-३, दस्त क्र.१८६७२/२०२१, हे हक्कसोडनुसार<br>**१) श्री. जगन्नाथ पोशा कोळी उर्फ वास्कर**<br>**२) श्री.मदन पोशा कोळी उर्फ वास्कर**<br>**३) श्री.हनुमान पोशा कोळी उर्फ वास्कर**<br>**४) श्री. जनार्दन जोमा कोळी** | निरंक |
| ८ | तळोजा १०२५ | पेंधर १/२००८ | २४८/१५ | ०-२०-० | २०० चौ.मी. | **भूखंड क्र. १०५, सेक्टर-२, क्षेत्र-१५० चौ.मी.** | **कै. शारदाबाई यशवंत कदम (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. विनोद यशवंत कदम<br>२) श्री. अनिल यशवंत कदम<br>३) श्रीमती रेणूका राजेंद्र सुर्वे | निरंक |
| ९ | तळोजा १०८७ | पेंधर १/२००८ | २६०/११ क | ०-६-० | ४० चौ.मी. | **भूखंड क्र. ४१, सेक्टर-२३, क्षेत्र-४० चौ.मी.** | **कै. संभाजी दिनकर कदम (मयत) यांचे वारस**<br>१) श्रीमती लक्ष्मीबाई संभाजी कदम<br>२) सौ. सिमाबेन नंन्नुभाई धोराजीआ | निरंक |
| १० | नवघर २०३/ ८५ | ४०९/ ८५-८६ | ३०९/५<br>३१४/१०<br>३१७/७<br>३४१/६<br>३४५/६<br>३४६/८<br>३४९/९<br>३५१/११<br>३५२/१<br>३२०/९<br>३४१/१०<br>३४२/९<br>३५१/२<br>३३१/७<br>३३५/६<br>३५३/८ | ०-०३-५<br>०-१८-०<br>०-१४-९<br>०-१६-०<br>०-०७-८<br>०-०७-८<br>०-०४-५<br>०-१६-०<br>०-०५-१<br>०-२०-०<br>०-०८-३<br>०-१२-६<br>०-०३-०<br>०-१४-०<br>०-०८-८<br>०-०५-६ | २३४८.५० पुर्णाकांत २३५० चौ.मी. पैकी | **द्रोणागिरी येथील सेक्टर क्र. ५५, भूखंड क्र. ३७, क्षेत्र ७५० चौ.मी. या इरादित भूखंडाची वाटपाची पुढील प्रक्रिया सुरु आहे.** | १) मुळ भूधारक-<br>**मालती प्रभाकर ठाकुर** | निरंक |
| | पागोटे १७१ (१) | | ६८/९ | ०-१०-९ | | | | |
| | पागोटे २६९ (२) | | ७/३(२)<br>१०/३ | ०-०४-०<br>०-०२-८ | | | | |
| | पागोटे २६९ (१) ८५/ ८६ | | १५/२<br>२७/४<br>३४/६<br>५१/५<br>६८/५अ<br>७७/३<br>८२/१० | ०-१७-७<br>०-०८-०<br>०-१९-०<br>०-१३-२<br>०-१२-४<br>०-०२-०<br>०-१२-५ | | | | |
| | | | **एकूण** | **२-६८-४** | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात, अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसक निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :–**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

**सिडको/जनसंपर्क/४९१/२०२१-२२**

# जग जिंकायचं असेल तर मोठी स्वप्ने बघायला हवीत : ना.आदित्य ठाकरे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

आपल्याला जग जिंकायचं असेल तर मोठी स्वप्ने बघायला हवीत. समोर आलेल्या अडचणींवर आत्मविश्वासाने मात करून विकासाकडे वाटचाल करायला हवी आणि यासाठी मी सदैव तुमच्या सोबत असेन, आपण सर्वजण एकत्र काम करू, असे प्रतिपादन पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांनी आज लोणेरे येथे केले.

लोणेरे येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्या–पीठ परिसरातील इन्क्युबेशन सेंटर व पदव्युत्तर संशोधन केंद्र इमारतीचे भूमीपूजन तसेच अनुसूचित जाती जमातीच्या मुलींच्या वसतिगृहाचे भूमीपूजन पर्यटन, पर्यावरण, राजशिष्टाचार मंत्री आदित्य ठाकरे यांच्या हस्ते संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते.



यावेळी रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री कु.आदिती तटकरे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री.उदय सामंत, परिवहन मंत्री ड.अनिल परब, खासदार श्री.सुनिल तटकरे, आमदार श्री.अनिकेत तटकरे, आमदार श्री.भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, आमदार महेंद्र थोरवे, आमदार योगेश कदम, आमदार प्रकाश सुर्वे, किशोरभाई जैन, मुंबई इमारत सुधार व पुर्नरचना मंडळाचे अध्यक्ष श्री.विनोद घोसाळकर, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ.अभय वाघ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरेचे कुलगुरु प्रा.डॉ.कारभारी काळे, कुलसचिव प्रा.डॉ.भगवान जोगी व इतर मान्यवर उपस्थित होते.

पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे पुढे म्हणाले की, एकीकडे छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेल्या स्वराज्याची राजधानी रायगडाचा पायथा तर दुसरीकडे या विद्यापीठाचे नाव डॉ.बाबासाहेब आंबेडकर. एकीकडे स्वराज्य दाखविलेला तर दुसरीकडे या देशाला संविधान दिलेले. या दोन्ही महापुरुषांच्या नावाशी जोडलेले हे तांत्रिक विद्यापीठ आहे. हे महाविकास आघाडीचे शासन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली तरुणांसाठी, महाराष्ट्रासाठी जे काही चांगले असेल ते अधिकाधिक करण्याचा प्रयत्न करीत आहे. कुठल्याही कॉलेजमध्ये राजकारण होऊ नये पण ते राजकारण चांगल्यासाठी असेल तर त्याचे स्वागतच आहे. मात्र शिक्षण व्यवस्थेची स्थिती सुधारावी म्हणून सर्वोतोपरी सर्व स्तरांवर प्रयत्न व्हायला हवेत. आजच्या काळात भारतासाठी महत्त्वाचे म्हणजे येथे मोठ्या संख्येने असलेला युवावर्ग. या युवावर्गाला शिक्षण चांगले पाहिजे, चांगला रोजगार मिळाला पाहिजे, तो सहज उपलब्ध झाला पाहिजे आणि त्याबरोबरच चांगले आरोग्यही मिळाले पाहिजे. ते पुढे म्हणाले की, शिक्षणाचे धोरण बदलत असताना त्यात आंतरराष्ट्रीयीकरण होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर युवावर्गासाठी शिक्षणाबरोबरच शिक्षणानंतर रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. याचाच विचार करून हॉटेल मॅनेजमेंटचे शिक्षण घेतलेल्या मुला–मुलींना आपल्या एमटीडीसीच्या रिसॉर्टमध्ये कसे समाविष्ट करून घेऊ शकतो, याचा आपण विचार करीत आहोत, त्यादृष्टीने धोरणात्मक निर्णय लवकरच घेण्यात येणार आहेत. युवावर्गाने रोज नवनवीन काय विचार करू शकता, मोठी स्वप्न काय बघू शकता, तुमची ताकद कशात आहे हे ओळखून तसा विचार झाला पाहिजे. केजी टू पीजी शिक्षण पद्धतीत आपण कशा प्रकारे अधिक सुधारणा करू शकतो याचा विचार व्हायला हवा.

ग्रामीण भागातील शाळेमध्ये देखील अद्ययावत सोयीसुविधा उपलब्ध करून द्यायला हव्यात. आपल्या विद्यार्थ्यांसाठी क्रिकेट, फुटबॉल, हॉकीचे मैदान उपलब्ध करून द्यायला हवे, असे सांगून श्री.आदित्य ठाकरे म्हणाले की, माजी राष्ट्रपती ए.पी.जे अब्दुल कलाम यांनी २००४ साली आपल्याला इंडिया २०२० आणि सुपर पॉवर होण्याचे स्वप्न दाखविले. त्यादृष्टीने आपण नक्की काय शिकतो व का शिकतो यावर लक्ष केंद्रीत केले तरच आपला देश पुढे जाऊ शकतो, हा विचार दिला. तरूण वर्गाने विविध क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळींचे विचार, कृती आत्मसात करून समृद्धीकडे वाटचाल करायला हवी. सोशल मिडीयाचा सकारात्मक उपयोग करून राज्याच्या अन् देशाच्या प्रगतीला हातभार लावायला हवा. ग्रामविकासाबरोबरच मानव विकासही तितकाच महत्वाचा आहे. आणि हा विकास शाश्वत विकास कसा होईल, यावर लक्ष केंद्रीत करणे महत्वाचे आहे.

आपल्याला जग जिंकायचं असेल तर मोठी स्वप्ने बघायला हवीत. असलेल्या अडचणींवर मात करून विकासाकडे वाटचाल करायला हवी आणि यासाठी मी सदैव तुमच्या सोबत असेन. आपण एकत्र काम करू, असेही ते शेवटी म्हणाले. यावेळी पालकमंत्री कु. आदिती तटकरे म्हणाल्या की, खऱ्या अर्थाने आपल्या सर्वांसाठीच अतिशय आनंदाचा दिवस आहे, कारण वर्षभरातच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याचे अनावरण आणि आज या परिसरातील इन्क्युबेशन सेंटर व पदव्युत्तर संशोधन केंद्र इमारतीचे भूमीपूजन तसेच अनुसूचित जाती जमातीच्या मुलींच्या वसतिगृहाचे भूमीपूजन असे दोन कार्यक्रम या विद्यापीठामध्ये संपन्न झाले. राज्य शासनाकडे या डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठास नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च याचा दर्जा मिळण्यासाठी आणि त्याचबरोबर त्याचा अभ्यासक्रम सुरू करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे दिलेला आहे. पण नवीन प्रस्तावास मंजुरी न मिळाल्यामुळे राज्य शासनाकडे हा प्रस्ताव स्थगित आहे. तरी हा प्रस्ताव पुन्हा एकदा राज्य शासनाच्यावतीने केंद्र शासनाला पाठविण्यात यावा, अशी विनंती या कार्यक्रमाच्या निमित्ताने पालकमंत्री या नात्याने कु.तटकरे यांनी केली. असा दर्जा मिळाला आणि संबंधित अभ्यासक्रम सुरू झाला तर कोकण विभागामध्ये औषध निर्माण क्षेत्रामध्ये क्रांती निश्चितपणे घडू शकते. अभ्यासक्रमांमध्ये निश्चितपणे वाढ होऊ शकेल.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री.उदय सामंत म्हणाले की, या भागात अशा प्रकारचे विद्यापीठ व्हावे, ही माजी मुख्यमंत्री बॅ.ए.आर.अंतुले यांची इच्छा होती. त्यांनी हा परिसर शासनाच्या सहकार्याने विद्यापीठाकडे दिला. या विद्यापीठाच्या विकासासाठी प्रस्ताव सादर केल्याबरोबर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चोवीस तासांमध्ये २० कोटी रुपये मंजूर केले. वसतिगृह मंजूर केले. येत्या काळात येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभा करायचा आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने ६ जून हा दिवस शिवराज दिन म्हणून साजरा करायचे ठरविले आहे. येत्या ०६ जूनला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या कामाचा शुभारंभ आदित्य ठाकरे यांच्या हस्ते होईल आणि त्याचं अनावरण पुढच्या ०६ जूनला या सगळ्यांच्या उपस्थितीत केले जाईल, असे सांगून श्री.उदय सामंत म्हणाले, या पुतळ्याच्या उभारणीसाठी एक कोटी रुपयांची प्राथमिक तरतूद विद्यापीठाच्या बजेटमध्ये केलेली आहे आणि आणखी लागणारा संपूर्ण निधी उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून देण्यात येईल. विद्यापीठाचे उपकेंद्र महाराष्ट्रामध्ये विविध जिल्ह्यांमध्ये सुरू करण्यात येत आहेत. या विद्यापीठाच्या परिसरात चांगल्या पद्धतीचे स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उभारले जाणार आहे. ते कोकणातील सर्वात मोठे स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स असेल. विद्यार्थ्यांसाठी अद्ययावत शिक्षण सुविधा निर्माण करण्यासाठी तंत्र व शिक्षण विभाग सदैव प्रयत्नशील राहील, असे ते शेवटी म्हणाले.

## संक्षिप्त...

### हटाळेश्वर चौकात जिवंत विद्युत वाहिनी रस्त्यावर पडली

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पालीतील हटाळेश्वर चौकात गुरुवारी (ता.३१) सकाळी एका विद्युत खांबावरील जिवंत विद्युत वाहिनी रस्त्यावर पडली. सुदैवाने त्यावेळी रस्त्यावर कोणतेही वाहन व नागरिक नसल्याने जीवितहानी टळली. येथील व्यावसायिक वसंत पालकर यांनी सांगितले की सकाळी येथील खांबावरून एक विद्युत वहिनी पेट घेऊन भररस्त्यात खाली कोसळली. त्यांनतर महावितरणच्या कर्मचाऱ्यांना बोलावण्यात आले. त्यांनी याठिकाणी दुरुस्ती करून वीज वाहिनी जोडली.



# वीर वाजेकर महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील फुंडे येथील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय महालण विभाग फुंडे येथे मुंबई विद्यापीठ मधील बीए बी कॉम, बीएससी, बीएससी आयटी, बीएमएस, एम ए, एम कॉम, परीक्षेत यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचे पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शरदचंद्र पवार महाविद्यालय आळंदी येथील प्राचार्य डॉ हंसराज थोरात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कोकण शिक्षक मतदार संघाचे आ. बाळाराम पाटील होते.



यावेळी बोलताना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. हंसराज थोरात म्हणाले, ’विद्यार्थी जीवनात यश हे अपघाताने मिळत नसून ती सातत्यपूर्ण प्रयत्नांची गुणवत्ता असते.

रयत चा विद्यार्थी हा सुजाण विद्यार्थी असून भारतीय प्रशासकीय सेवेत त्यांनी आपला ठसा उमटवावा.’ कार्यक्रमाचे अध्यक्ष माआमदार बाळाराम पाटील बोलताना म्हणाले की,’ विद्यार्थी हा शिक्षण व्यवस्थेच्या केंद्रस्थानी असून विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण प्रयत्न करून यशाची वेगवेगळी शिखरे गाठावीत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आपल्या विभागातील विद्यार्थी प्रकल्पग्रस्त असून वेगवेगळे आव्हानांना सामोरे जाण्याची तयारी त्यांनी ठेवावी. आपल्या क्षेत्रात उत्तुंग कार्य करून भविष्यात महाविद्यालयाच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाचे योगदान द्यावे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी जी पवार यांनी केली कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. आर.डी कांबळे यांनी आभार मानले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.एस बी ओहोळ उपप्राचार्य डॉ.विलास महाले उपप्राचार्य डॉ.प्रा.घोरपडे, यु. टी सर्व प्राध्यापक,शिक्षकेतर सेवक , विद्यार्थी,नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.. डॉ. सुजाता पाटील व डॉ. विद्या नावडकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले

# कानसई येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्याजवळील ऐनघर पंचक्रोशीतर्फे कानसई येथे शुक्रवार दि.१ ते शनिवार दि.२ एप्रिल रोजी अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे सामुदायिक पारायणाचे आयोजन करण्यात आले आहे. स्व.सु.नि.अलिबागकर महाराज यांच्या कृपाछत्राखाली स्व.सु.नि.गुरुवर्य गोपाळबाबा वाजे , स्व.सु.नि.गुरुवर्य धोंडु बाबा कोल्हाटकर व वै ह.भ.प. काशिनाथ महाराज मोरे यांच्या कृपाशीर्वादाने गुरुवर्य नारायणदादा वाजे, ह.भ.प.दत्ताराम महाराज कोल्हाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली ह.भ.प. नारायण रामजी काते यांच्या प्रेरणेने सुरू असलेल्या या सोहळ्यानिमित्त विविंध कार्यक्रम होणार आहेत.

या कार्यक्रमांमध्ये काकड आरती, पारायण, ज्ञानेश्वरीचे वाचन, प्रवचन, हरिपाठ, किर्तन असे कार्यक्रम होणार आहेत. शुक्रवार दि.१ रोजी ह.भ.प. नामदेव महाराज यादव (तामसोली) यांचे प्रवचन तर ह.भ.प.मारुती महाराज कोल्हाटकर (तळवली) यांचे किर्तन होईल. त्यानंतर शनिवार दि.२ रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प.नारायणदादा वाजे महाराज मठाधिपती पंढरपूर (अलिबागकर महाराज) यांचे काल्याचे किर्तन झाल्यानंतर संपुर्ण कानसई गावातुन पालखी सोहळा पार पडणार आहे. शेवटी आलेल्या सर्व भाविकांना महाप्रसाद देऊन कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

# रमजान महिन्यात वीज पुरवठा सुरळीत ठेवा महावितरणला स्टार फाऊंडेशनतर्फे निवेदन

**दै.रायगड नगरी । मुरुड**

३ एप्रिल पासून मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना सुरु होत असून असंख्य मुस्लिम बांधव या दिवसात उपवास असतात. सध्या मुरुड तालुक्याचे तापमान ३८ डिग्री सेल्सियस असून गर्मी खूप वाढली आहे. वातावरण ता–पले असताना वीज महावितरणने कारण नसताना अथवा भारनियमन नाव–ाखाली तासंतास वीज घलवू नये. त्यामुळे विनाकारण उपवास असणाऱ्या लोकांना खूप मोठा त्रास सहन करावा लागत असतो.

तरी ३ एप्रिल पासून रमजान महिना संपेपर्यंत वीज घालवू नये असे निवेदन स्टार फाऊंडेशनचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष जाहिद फकजी व त्यांच्या सहकार्यांनी मुरुड महावितरणचे उप मुख्य कार्यकारी महादेव दातीर याना रीतसर निवेदन देण्यात आले आहे. यावेळी त्यांच्या समवेत फहाद कादरी, नौशाद दौनाक, इम्तियाज गोलंदाज, असम कारभारी, मुबीन सोंडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. रमजान मधील पूर्ण दिवसांपैकी सकाळचा प्रहर, व सायंकाळचा प्रहर हा खूप महत्वाचा असतो अश्यावेळी विनाकारण वीज घालवू नये अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. सदरचे निवेदन स्वीकारताना उप मुख्य कार्यकारी महादेव दातीर यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून महावितरण ३ एप्रिल पासून विजेचे व्यवस्थित नियोजन करणार आहे. ज्यावेळी तातडीची गरज असेल तेव्हाच आम्ही वीज घालवू लोकांना जास्तीत जास्त वीज पुरवठा देणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

# कळंबोलीतील उद्यान पाण्याविना सुकू लागली, नळ जोडणी तोडली

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

जनतेला प्यायला पाणी नाही तर उद्यानांना कुठून पाणी देणार या विचित्र नियमावलीनुसार कळंबोलीतील उद्यानाचे चे पाणी जोडणी बंद करण्यात आली आहे. त्यामुळे कळंबोलीतील उद्यानातील झाडे पूर्णता सुकू लागली आहेत. जमिनीला मोठमोठ्या भेगा पडल्या आहेत .एकीकडे पाण्यासाठी उपाय योजना करता येत नसतानाही मात्र अन्य कामे मात्र ३१ मार्च च्या अगोदर करण्याचा पूर्ण करण्याचा खटाटोप सिडको प्रशासनाकडून करण्यात येत असल्याचे मात्र दिसून येत आहे. याबाबत सिडकोचे कळंबोलीतील अधिकारी गाडे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी उद्यानातील नळजोडणी बंद करण्यात आली असून आता बोरवेल ची व्यवस्था करून झाडांना पाणी पुरवठा पूर्ववत केला जाणार असल्याचे सांगितले.



कळंबोली वसाहतीमधील सेक्टर ६ मध्ये मोठे उद्यान आहे. उद्यानात गेले पाच ते सहा दिवसापासून झाडांना पाणी देण्यात आलेले नाही. त्यामुळे उद्यानातील झाडे सर्व सुकू लागली आहेत. जमिनीला भेगा पडू लागल्या आहेत. या उद्यानांमध्ये माळी काम करणारा माणूस तर दिसून येत नाही . उद्यान मध्ये जी व्यवस्था पाहिजे ती पूर्णपणे देण्यात आलेली दिसून येत नाही. सुरक्षारक्षकही नाही, त्यामुळे उद्यानामध्ये सायकल चालवतात तर काहीजण फुटबॉल खेळतात .फुटबॉलचा प्रसादही आबालवृद्धांना बसून जखमी होण्याचे प्रकारही वारंवार घडत आहेत. स्थितीत पाणी पुरवठा नसल्याने झाडे पूर्ण पने सुकू लागली आहेत. याबाबत सिडको विभागातील गाडे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की सिडकोच्या वरिष्ठ पातळीवरूनच उद्यानातील पाणीपुरवठा बंद करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. नागरिकांनाच प्यायला पाणी अपुरे असल्याने झाडा ना पाणी कसे देणार असा प्रश्न उपस्थित केला आहे. या पुढे बोरवेल खणून झाडांना पाणी पुरवठा पूर्ववत केला जाईल असे सांगण्यात आले.एकीकडे उद्यानातील झाडांना पाण्यासारखी महत्त्वाची जीवनावश्यक बाब आवश्यक असताना मात्र बांधकाम विभागातील कामे ३१ मार्च च्या पूर्वसंध्येला पूर्ण करण्याचा खटाटोप करताना मात्र नागरिकांना दिसून आला. उद्यानात काही ठिकाणी सिमेंट ब्लॉक बसवण्यात आले मात्र अन्य पूर्वीच्याच सिमेंट ब्लॉक न कलर मारून नवीन करण्यात आल्याचे दाखवण्यात आल्याने नागरिकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. उद्यानातील खेळणी ही तुटलेल्या अवस्थेत पडून आहेत. कचऱ्याचे ढीग पुन्हा रचू लागल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. या ठिकाणी पूर्णवेळ सुरक्षा रक्षक व माळी काम करणारा कोणीही दिसून येत नाही .त्यामुळे उद्यानाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे .येथे विजेचे दिवेही पूर्णावस्थेत सुरू नसल्याने रात्रीच्या वेळी गर्दुल्ले व मद्यपी येथे ठाण मांडून बसलेले असतात. याकरता उद्यानात कायमस्वरूपी माळी काम करणारा व सुरक्षारक्षक नेमण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# महाराष्ट्र कोर्ट प्रिमियर लिग स्पर्धेत रायगड मावळा क्रिकेट संघाचा सलग दुसरा विजय

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र राज्यातील न्यायालयीन कर्मचार्यांसाठी महाराष्ट्र कोर्ट प्रिमियर लिग २०२२ क्रिकेट सामन्यांचे आयोजन जळगाव येथे करण्यात आले आहे. हे क्रिकेट सामने ३० मार्च ते ०३ एप्रिल पर्यंत होणार असून रायगड जिल्हयातील न्यायालयीन कर्मचार्यांच्या रायगड मावळा क्रिकेट संघाने सामन्यात सहभाग घेतला असून पहिला सामना रायगड मावळा क्रिकेट संघ विरुध्द धुळे वॉरियर्स यांच्यात झाला. या सामन्यात रायगड मावळा संघाने विजय मिळवला. त्या सामन्यात अलिबाग न्यायालयातील कार्यरत नयन पाटील यांनी २६ चेंडूत ६४ धावा काढून गोलंदाजीतही चमक दाखवत १ बळी




घेतल्याने त्यांना सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले.

त्याचप्रमाणे दुसरा सामना रायगड मावळा क्रिकेट संघ विरुध्द उस्मानाबाद क्रिकेट संघ यांच्यामध्ये खेळला गेला. त्यामध्ये सुध्दा रायगड मावळा क्रिकेट संघाने सलग दुसरा विजय मिळवला. त्या सामन्यात उरण न्यायालयातील कार्यरत संदीप पाटील यांनी ३ बळी घेतल्याने त्यांना सामनावीर पुरस्कार घोषित करण्यात आला.

सलग दोन विजय मिळवीत रायगड मावळा क्रिकेट संघाने आपले वर्चस्व दाखवून दिले.

# ना. नितीन गडकरी यांची 3 एप्रिलला रायगडमध्ये

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

इंदापूर येथील इंदापूर ते दिघी पोर्ट रस्त्याचे उदघाटन व महाड येथे महाड ते रायगड किल्ला रस्त्याचे उदघाटन कार्यक्रमांस भाजपाचे अभ्यासु नेतृत्व व केंद्रीय मंत्री ना. नितीनजी गडकरी रविवार दि. ३ एप्रिल रोजी उपस्थित राहणार आहेत. यासाठी दुपारी ३.३० वाजता ना. नितीनजी गडकरी इंदापूर येथे उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे इंदापूर येथील कार्यक्रमांस रोहा तालुक्यातील भाजपच्या बहुसंख्य कार्यकर्त्यांनी आपल्या नेत्यांच्या स्वागतासाठी उपस्थित राहावे असे आवाहन भाजपा रायगड लोकसभा समन्वयक तथा रोहा तालुका अध्यक्ष सोपानभाऊ जांबेकर यांनी केले.

भाजपाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आ.प्रशांत ठाकुर, आ.रविशेठ पाटील, दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहिते व रायगड जिल्हा संघटक सतिश धारप



यांच्या मार्गदानाने सोपानभाऊ जांबेकर यांनी नागोठणे येथील भाजपच्या जनसंपर्क कार्यालयात गुरुवारी दुपारी १२ वाजता कार्यकर्त्यांची बैठक घेतली. त्यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांशी चर्चा करताना सोपानभाऊ जांबेकर यांनी वरील आवाहन केले. यावेळी जिल्हा उपाध्यक्षा श्रेया कुंटे, तालुका सरचिटणीस आनंद लाड, भाजपाचे रायगड जिल्ह्याचे माजी प्रसिद्धी प्रमुख शामकांत नेरपगार, शिक्षण सेल तालुका अध्यक्ष अशोक अहिरे, तालुका खजिनदार प्रमोद गोळे, नागोठणे शहर अध्यक्ष सचिन मोदी, सिराजभाई पानसरे, सुभाष पाटील, संतोष लाड, रऊफ कडवेकर, नागोठणे जि.प. गट अध्यक्ष शेखर गोळे, विभागीय अध्यक्ष ज्ञानेश्वर शिर्के, शहर सरचिटणीस तिरतराव पोलसानी, रोहा तालुका उपाध्यक्ष अपर्णा सुटे,रोहा तालुका महिला मोर्चा उपाध्यक्ष माधुरी रावकर, चिटणीस निलिमा राजे, नागोठणे शहर महिला मोर्चा अध्यक्ष शीतल नांगरे, नागोठणे विभाग सरचिटणीस मुग्धा गडकरी, शहर उपाध्यक्ष सुखदा वढावकर, नागोठणे शहर उत्तर भारतीय सेल अध्यक्ष सोनी पांडे आदी प्रमुख कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.